स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मानव्य विद्याशाखे अंतर्गत इतिहास विषयातील पीएच. डी पदवीकरिता सादर करावयाचा शोधप्रबंधाचा प्राथमिक आराखडा

‘ शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण – एक विश्लेषणात्मक अभ्यास’

संशोधक

विनोद सखाराम बोरकर

एम ए नेट, सेट

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ काशीनाथ निवृत्तीराव चव्हाण

एम ए पीएच डी

इतिहास विभाग

श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय, वसमत ता. जि. हिंगोली

संशोधन केंद्र

नूतन महाविद्यालय, सेलू

ता. सेलू जि परभणी. ४३१५०३

एप्रिल २०२२

‘ शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण – एक विश्लेषणात्मक अभ्यास ’

प्रस्तावना

छत्रपती शिवाजी महाराजांना २०३० मध्ये ४०० वर्ष पुर्ण होतील. छत्रपतींचे नाव घेतल्यावरच एक विलक्षण तेजस्वी व्यक्तिमत्व आपल्यासमोर उभे राहते. शिवरायांच्या व्यक्तिमहत्वाचा वेध घेण्याचा प्रयत्न अनेक इतिहासकारांनी, शिवप्रेमींनी केला आहे. सरंजामशाही काळात छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये कोणते असे वेगळेपण आहे की, त्यांना लोकल्याणकारी राजा म्हणून संबोधले गेले. हा जगातील एकमेव राजा सरंजामदार असूनही लोककल्याणकारी, सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण प्रस्थापित करणारा म्हणून ओळखल्या गेला. सर्वांनी आपल्या सोयीनुसार छत्रपती शिवाजी महाराजांचा वापर करीत आहेत. गेल्या २०० वर्षोंत अभ्यासकांनी छत्रपती शिवाजी महाराजांची वेगवेगळी प्रतिमा रंगविली. छत्रपती शिवराय कट्टर हिंदूत्ववादी, क्षत्रिय जातीचे अभिमानी असल्याचे चित्र साहित्य, चित्रपटातून लोकांसमोर मांडले. मात्र छत्रपती शिवाजी महाराज हे सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय न्यायाचे प्रतिक, मानतावादी, लोककल्याकारी, आंतरजातीय विवाहाचे प्रोत्साहक, शोषणमुक्त सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय न्यायांचे धोरण प्रस्थापित करणारे होते. ते कोणत्याही समाजातील धार्मिक, आर्थिक, लेंगिक शोषणाच्या विरोधात होते. म्हणून स्वराज्यात शोषणमुक्त समाजाचा अग्रह धरला. यांच कारणच म्हणजे स्वराज्यात सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण प्रस्थापित करण्यासाठी शेतकरी, कष्टकरी, स्त्रीयांचे शोषण कोणीही करणार नाही त्यासाठी फर्माने काढले. यातून शिवरायांची प्रतिमा कशी सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय न्यायास अभिप्रेत होती हे वास्तव समोर आणण्याचे आव्हान आजही सर्वांसमोर आहे. ‘ धार्मिक आणि सांस्कृतीक सत्ता ही राज्यसत्तेपेक्षा प्रबळ असते. आपल्याकडे इतिहासाची साधणे जपली गेली नाहीत. त्यामुळे ज्यांना इतिहास लिहिता वाचता येत होते. त्यांनी सोयीनुसार इतिहास लिहिला. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या कार्यातून सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण अंगिकारले होता. हे छत्रपती शिवाजी महाराज सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण राबविणारे लोकांसमोर आले नाहीत. आपल्या राजनैतिक, सामाजिक, प्रशासनिक, स्त्रीविषयक दृष्टिकोनातून शेतकरी, कष्टकरी, शूद्र, अतिशूद्र यांच्यासाठी आपल्या स्वराज्य संकल्पनेतून सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण राबविण्याचे काम छत्रपती शिवाजी महाराजांनी केल्याचे दिसून येते.

स्वातंत्र्य, समता, समानता, सामाजिक न्याय, एकता, बंधूता ही सर्व लोकशाहीची मुल्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्यात रूजवलेली दिसतात. यांची प्रतिबिंब त्यांच्या विचारातून, स्त्री सन्मान, दुर्गे संपन्न वैभव, शेतकऱ्याच्या सन्मानाला, रयतेच्या विश्वासाला, धुंरदर राजकारणाला या सर्व कार्यातून सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणातून दिसते. १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी निर्माण केलेले स्वराज्य व इतर शाहया आणि मोगंल यामध्ये फरक जाणवतो. कारण छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वत: स्वराज्य निर्माण केले, तेही रयतेला सोबत घेऊन. त्यातून स्वराज्यांची निर्मिती ही शोषण मुक्त समाज आणि सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण यावर आधारित समाजरचना निर्माण केली. छत्रपती शिवाजी महाराजाचे चरित्र, विचार, आणि व्यवहार या तीनही पातळीवर जगाच्या पाठीवर

एकमेव राजा होता. ज्यांचा संपूर्ण कार्य सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण कल्याणकारी, सामाजिक न्याय, शोषणमुक्त समाजाची रचना करण्यावर होता. त्यांची संपूर्ण आज्ञापत्रे केवळ आणि केवळ शेतकरी, स्त्रीया, गुलामगिरी, अत्याचार, यांचे शोषण करऱ्याच्या विरोधात होती. त्यांची संपूर्ण कार्यपध्दती शुद्र व कष्टकरी समाजाला प्रतिष्ठा मिळवून देण्याची होती. ' हिंदवी स्वराज्य ' म्हणजे हिंदूचे राज्य नसून ' बहुजनांचे राज्य' होय. हा शब्द धर्मवाचक नसून प्रदेशवाचक आहे. 'आपले स्वराज्य' या अर्थाने हिंदवी स्वराज्याची संकल्पना महारांजानी वापरली. म्हणून ते धार्मिक जरी असले, तरी सर्वधर्म समावेशकता, धर्मनिरपेक्ष, सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण प्रस्थापित करणारे होते. छत्रपती शिवाजी महाराज मुस्लीम विरोधी होते असे बोलले जाते, परंतु तसे ते नव्हते. हिंदू—मुस्लीम वाद हा धार्मिक नसून राजकीय होता. यातूनच छत्रपती शिवाजी महाराजांची सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणातून दिसते.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या अनेक पैलूपैकी एक महत्वाचा पैलू म्हणजे सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण होय. त्यांची सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण आजपर्यंत इतिहासकांरानी समोर आणलेली दिसून येत नाही. त्यांचा खरा इतिहास महात्मा फुले यांनी समोर आणण्याचा प्रयन्त केला असे दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांनी सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण आपल्या स्वराज्याच्या कल्याणासाठी राबविलेले दिसते. कोणावरही अन्याय अत्यावार होणार नाही, शोषण होणार नाही याची दक्षता ते घेत असत. म्हणून ते समातक्रांतिकार, लोककल्याणकारी व नवसंस्कृतीचे जनक हे त्यांच्या सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणातून दिसून येते. त्यांनी केलेल्या लढाया हे त्यांचे २० टक्के कार्य असून ८० टक्के कार्य सामाजिक, आर्थिक, सांस्कृतीक, प्रशासकीय, कृषीविषयक आहे.

संशोधनाची आवश्यकता

प्रस्तुत शोधप्रबंध ' शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण — एक विश्लेषणात्मक अभ्यास' हा आहे. भारताच्या मध्ययुगीन इतिहासातील १७ व्या शतकात छत्रपती शिवाजी महाराजांनी शुन्यातून स्वराज्याची निर्मिती केली. मुळात स्वराज्य स्थापनेचा हेतु म्हणजे रयतेला सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय देणे हा होता. परंतु ३५० वर्षांनी सुध्दा छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केल्याल्या स्वराज्याची आजच्या घडणाऱ्या दैनंदिन घटनावरून होते. राजकारण, समाजकारण, प्रशासन, अर्थकारण व स्त्रीविषयांची भूमिका यातून रयतेची पिळवणूक होताना दिसते. सामान्य माणसाला न्याय मिळत नाही असे दिसून येते. तर सामाजिक भेद वाढत असून, आरक्षण संघर्ष होताना दिसून येत आहे. नैसर्गिक आपत्ती, स्त्री ही सुरक्षित नाही. हे प्रश्न सोडण्याचा प्रयत्न होत आहे. परंतु वेळेवर होत नाही असे दिसून येते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांनी ज्या पध्दतीने आपल्या स्वराज्यात रयतेच्या कल्याणसाठी सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण राबवून सर्वांना सन्मानतेची वागणूक दिली होती. ती भूमिका समाजासमोर आणण्याची आवश्यक मला वाटली. त्यामुळे प्रस्तुत शोधप्रबंध ' शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण — एक विश्लेषणात्मक अभ्यास' यातून ती समोर आणण्याचा प्रयत्न राहिल.

संशोधन विषयाचे महत्व

छत्रपती शिवाजी महाराजांना लोककल्याकारी, सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण प्रस्थापित करणारे राजा संबोधयाचे. कारण म्हणजे शोषणमुक्त बहुजन समाजरचना स्वराज्यात प्रस्थापित केली. ते कोणत्याही समाजातील धार्मिक, आर्थिक, लैंगिक, शोषणाच्या विरोधात होते. म्हणून त्यांनी स्वराज्यामध्ये शोषणमुक्त समाजाचा अग्रह धरून सामाजिक न्याय प्रस्थापित केला. शेतकरी, स्त्रीयांचे शोषण कोणीही करणार नाही, त्यासाठी फर्माने काढले. त्यांची संपूर्ण आज्ञापत्रे केवळ आणि केवळ शेतकरी, गुलामगिरी, अत्याचार, शोषण यांच्या विरोधात होती. त्यांची संपूर्ण कार्यपध्दती शूद्र व कष्टकरी समाजाला प्रतिष्ठा मिळवून देण्याची होती. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र, विचार आणि व्यवहार या तीनही पातळीवर जगाच्या पाठीवर एकमेव राजा होता. त्यांचा संपूर्ण व्यवहार सामाजिक न्याय, शोषणमुक्त समाजाची रचना करण्यावर होता. त्यांनी स्वराज्यात राबविलेले सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण आजपर्यंत बऱ्यापैकी समाजासमोर आली नाही. तरी वरील पैकी सर्व माहिती ही हया विषयांचे महत्व होते. त्यामुळे माझ्या संशोधनाचा विषय ' शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण – एक विश्लेषणात्मक अभ्यास'_या विषयाच्या संशोधन माध्यमातून समोर आणण्याचा माझा प्रयत्न राहिल.

संशोधन विषयाचे स्वरूप व व्याप्ती

माझ्या संशोधन कार्याचा विषय हा आहे. ' शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण – एक विश्लेषणात्मक अभ्यास ' तरी या विषयांचे स्वरूप आणि व्याप्तीचे विश्लेषण १७ व्या शतकात महाराष्ट्रातच नव्हे तर संपूर्ण देशात चार्तुवर्ण व्यवस्थेच काटेकोर अंमलबजावणी असल्याच्या काळातच शिवकालखंडा उदय झाला. त्याकाळात पण छत्रपती शिवाजी महाराजांनी समता, समानता, सामाजिक न्याय, एकता, बंधूता ही सर्व लोकशाहीची मुल्ये छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणातून स्वराज्यात रूजवलेली दिसतात. आणि पुढे अशीच चालु राहावी यासाठी प्रयन्त केले. ते आपल्याला इ स १७०७ पर्यंत महाराणी ताराराणी यांच्या मध्ये दिसून येतात. त्यांची संपूर्ण आज्ञापत्रे केवळ आणि केवळ शेतकरी, गुलामगिरी, अत्याचार, शोषण करऱ्याच्या विरोधात होती. त्यांची संपूर्ण कार्यपध्दती शूद्र व कष्टकरी समाजाला प्रतिष्ठा मिळवून देण्याची होती.

या संशोधनाची व्याप्ती म्हणजे छत्रपती शिवाजी महाराज यांचा इ स १६३० ते १६८० पर्यंतचा हा कालखंडातील छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळयांना सोबत घेऊन शुन्यातून स्वराज्याची निर्मिती केली होती. ती कशा प्रकारे सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय दृष्टीकोनातून मग आर्थिक, सामाजिक न्याय, स्त्रीविषयक, युध्दनीति, ह्या पैलू वर त्यांच्या सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणातून व्याप्ती दिसून येते. प्रशासनातील पदे असो किंवा शेतकरी, कष्टकरी, महिलाचा सन्मान मग ती शत्रूची काय असेना, युध्दनीति हयांना आपल्या आज्ञापत्रातून सामाजिक न्याय आपल्या स्वराज्य देण्याचा प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांने केल्याचा दिसतो. आणि पुढे कसा टिकून राहील यासाठी पण प्रयत्न केल्याचे आपल्या आज्ञापत्रातून दिसून येते. ही सर्व घटकामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची कार्याचीव्याप्ती दिसून येते.

संशोधनासाठी घेतलेला विषय

संशोधन कार्यासाठी घेतलेला विषय ‘ शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण — एक विश्लेषणात्मक अभ्यास’ हा आहे. भारताच्या इतिहासातील मध्ययुगीन कालखंडातील १७ व्या शतकातील आहे. या कालखंडातील छत्रपती शिवाजी महाराजांनी मावळयांना सोबत घेऊन शुन्यातून स्वराज्याची निर्मिती केली होती. ती कशा प्रकारे सामाजिक न्यायाचा दृष्टीकोनातून मग स्त्रीविषयक, प्रशासन, धार्मिक ह्या पैलू वर त्यांच्या सामाजिक आणि आर्थिक न्यायाचे धोरणावर सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण कार्याचा प्रभाव होती दिसून येते. सरंजामशाही काळात छत्रपती शिवाजी महाराजांमध्ये कोणते असे वेगळेपण आहे की, त्यांना लोकल्याणकारी राजा म्हणून संबोधले गेले. हा जगातील एकमेव राजा सरंजामदार असूनही लोककल्याणकारी, सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण प्रस्थापित करणारा म्हणून ओळखल्या गेला. इ स १६७४ मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांचा पहिला राज्यभिषेक वैदिक पध्दतीने झाला. कॉ. शरद पाटील असे म्हणतात की, महाराजांनी जाणीपूर्वक शाक्त धर्मीय पध्दतीने दुसरा राज्याभिषेक केला. तो करण्याचा महाराजांचा हेतु होता की, शूद्रातिशूद्रांचा, शेतकऱ्यांचा, कष्टकऱ्याचा, सर्वसामान्यांचा रयतेचा राजा आहे. हे सिध्द करायचे होते. म्हणून छत्रपती शिवाजी महाराजांना बहुजन प्रतिपालक म्हणतात. यातून या छत्रपती शिवाजी महाराजांचे राज्य हे सामाजिक, आर्थिक व प्रशासकिय धोरण न्यायावर आधारित होते. हे या संशोधनाच्या माध्यमातून समोर आणण्याचा प्रयत्न केला राहिल.

संशोधनाची उद्दिष्टये

१. शिवपूर्व कालखंडातील सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणाचा अभ्यास करणे.
२. शिवपूर्व कालखंड व शिवकालखंडातील सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणाचे तुलनात्मक अध्ययन करणे.
३. छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासन व्यवस्थेतील सामाजिक न्यायाचे तत्व अधोरेखीत करणे.
४. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कालखंडातील सामाजिक धोरणाचा अभ्यास करणे.
५. लोककल्याणकारी राज्यकर्ता म्हणून छत्रपती शिवारायांचे विचार व कार्यावर प्रकाश टाकणे.
६. छत्रपती शिवाजी महाराजांच्या धर्म व स्त्री विषयक दृष्टीकोन अभ्यासने.

संशोधनाची गृहितके

१. **शिवपूर्व कालखंडातील राज्यव्यवस्था सरंजामदारी, जुलूमी व दमणकारी होती.**
२. **प्रशासनाचे विकेंद्रिकरण, लोकाभिमुखता व सामाजिक न्याय ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या राजकीय व्यवस्थेची वैशिष्टये होती.**
३. **सर्वसामान्य रयत अठरा पगड जाती धर्माच्या लोकांना स्वराज्याच्या छत्राखाली आणून छत्रतपी शिवाजी महाराजांनी लोककल्याणकारी व्यवस्थेची पायाभरणी केली.**
४. **छत्रपती शिवाजी महाराजांनी सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय न्यायावर आधारित व्यवस्थेचा आकृतीबंध निर्माण केला.**

५. **शेतकरी, कष्टकरी, स्त्रीया, बारा बलुत्तेदार इत्यादी घटकांना सन्मान व त्यांना सामाजिक प्रतिष्ठा बहाल करणे हे महाराजांच्या स्वराज्याचे प्रधान उद्दिष्ट होते.**
६. **छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रतिगामी विचारसरणीला विरोध करून प्रगत धोरण राबविले.**

संशोधनाच्या मर्यादा

मराठा साम्राज्यावर मोठया प्रमाणात संशोधन झाले आहे. परंतु प्रस्तुत शोधप्रबंध ‘ शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण – एक विश्लेषणात्मक अभ्यास’_हा आहे._छत्रपती शिवाजी महाराजांनी आपल्या स्वराज्याची निर्मिती ही सामाजिक, आर्थिक व प्रशासकिय न्यायावर केली होती. तर या प्रस्तुस्त शोधप्रबंधामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणाचा अभ्यास केला जाईल. परंतु यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या सर्व घटकांना या शोधप्रबंधातून न्याय देता येणार नाहीत. त्यामध्ये संशोधन कार्याला काही मर्यादा येतील. कारण सर्वच स्वराज्य सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणावर आधारित होते. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या महत्वाच्या घटकांना जो समाजाला आज पण त्यांची उपयोजिता वाटते. अशा घटकांना संशोधन कार्याच्या माध्यमातून समोर आणण्याचा माझा प्रयत्न राहिल. वेळ, श्रम. पैसा वैयक्तिक मर्यादा शासकीय खात्यातील नियम मोडी, पर्शियन किंवा इतर परकीय भाषातून ज्या इतिहासकांरानी मराठा साम्राज्यावर लेखन केले आहे. भाषा व लिपी समजण्यासाठी अडचणी या सर्व मर्यादा लक्षात घेऊन वास्तवदर्शी संशोधनसाठी मूळ कागदपत्राचा उपयोग करण्याचे निश्चित केले आहे.

संशोधन पध्दती

ऐतिहासिक तसेच विश्लेषणात्मक तथ्ये संकलन करून विश्लेषणात्मक मांडणी करणे.

प्राथमिक स्त्रोत

प्रस्तुत संशोधनात ऐतिहासिक पध्दतीचा अवलंब १६ व्या तसेच १७ व्या शतकातील व्यवस्थाचा कार्यपध्दतीचा अभ्यास, काही ऐतिहासिक साधन पध्दतीचा अवलंब जुने पत्रे, महाराजांची आज्ञापत्रे, इतर राजांना पाठवलेली पत्रे, मोगल ब्रिटिशांना पाठवलेली आज्ञापत्रे, आपल्या सरदारांना किल्लेदारांना वेळोवेळी लिहिलेली आज्ञापत्रे

लिखित स्त्रोत

इतिहासकांरानी केलेले लिखाण बखर, सेतु माधवराव पगडीचे लिखाण, आधुनिक काळातील विविध लेखकांनी केलेले संशोधनपर लिखाण, महाराजांचे चरित्र, ब्रिटिश कालखंडातील लिखाण, काही मौखीक संदर्भ ग्रंथ

प्रकरण आराखडा / योजना

१. **शिवपूर्वकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय पार्श्वभूमी**
२. **शिवकालीन समाजातील सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय पार्श्वभूमी**
३. **शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण.**
४. **शिवकालीन प्रशासन व्यवस्था.**

५. शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणाची प्रासंगिकता
६. समारोप आणि निष्कर्ष
संदर्भ सूची
परिषिष्टे

प्रकरण पहिले
शिवपूर्वकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय पार्श्वभूमी

शिवपूर्वकालीन उत्तर भारतात मोगल सत्ता होती आणि दक्षिणेत कुतुबुशाही, आदिलशाही, बरीदशाही, इमादशाही या शत्रूनी शाह्यांनी महाराष्ट्राला व्यापले होते. पश्चिम किनारटट्टीवरील गोव्यात आणि वसईत पोर्तुगिजांनी अगोदरच राज्य स्थापन केले होते; तर इंग्रच, डच, फ्रेंच, यांनी व्यापारी कंपन्याच्या माध्यमांतून वखारींच्या रूपात चंचु प्रवेश केला होता. अहमदनगरच्या निजामशाही आणि विजापूरचा आदिलशाहा या दोन सुल्लतानांनी आपसात वाटून घेतला होता. ते मनाने उदार नव्हते. ते प्रजेवर जुलूम करत होते या दोघांचे एकमेकांशी हाडवैर होते. त्यांच्यात नेहमी लढाया होत. त्यात रयतेचे हाल रयत सुखी नव्हती. उघडउघड उत्सव करणे, पुजा करणे धोक्याचे झाले होते. रयतेला पोटभर अन्न मिळत नव्हते. राहायला सुरशिक्षत निवाराही नव्हता. सगळीकडे अन्याय अत्याचार माजला होता. महाराष्ट्रात ठिकठिकाणी देशमुख, देशपांडे इत्यादी वतनदार होते. पण रयतेकडे त्यांचे लक्ष नव्हते. देशावर त्यांचे प्रेम नव्हते. प्रेम होते फक्त वतनावर ते एकमेकांशी भांडत आपापसात लढत त्यात रसतेचे खूप हाल होते. या साऱ्या गोष्टीमुळे रयत त्रासुन गेली होती. सगळीकडे अंदाधुदी माजली होती. इ स १६४० मध्ये आदिलशाहाचा सरदार ‘ मुरार जगदेव’ याने पुण्याभोवती गाढवांचा नांगर फिरवून त्या ठिकाणी पहार रोवली आणि जनतेला सांगितले की, ही जागा वस्ती करण्यासाठी योग्य नाही. जो वस्ती कोणी या ठिकाणी वस्ती करील, त्याचा विनाश होईल.

प्रकरण दुसरे

शिवकालीन सामाजातिल सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय पार्श्वभूमि

छत्रपती शिवाजी महाराजांनी राज्यक्रांतीऐवजी समाजक्रांती केली. त्यांनी स्वराज्यासाठी पोषक ठरेल अशी सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणातून पार्श्वभूमी तयार केली. विशेषत: शेतकरी, कष्टकरी व स्त्रीरक्षक म्हणून त्यांची प्रतिमा निर्माण झाली. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारसरणीमध्ये समाजक्रांती, नव—समाजरचना आणि नवी कृषी संस्कृती या तीन गोष्टी दिसतात. आपल्याच रयतेचे राज्य, लोककल्याणकारी राज्य निर्माण करायचे असेल तर समाज आपल्या सोबत हवा. म्हणून अठरापगड जातींना सोबत घेतले. प्रसंगी आपल्या समाजाचा विरोध पत्करला, त्यातून दौलत खानसारख्या अनेकांना प्रमुख बनवले. जे लोक शेती व समुद्रावर जीवन जगत होते, त्यांना क्षत्रिय बनवले.. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेच्या कल्याणासाठी सत्तेचा वापर केला. या वेळी घोरपडे, शिर्के, निंबाळकर, खेडसावंत हे सर्व मराठे महाराजांच्या विरोधात गेले. तरीही त्यांनी त्याचा विचार केला नाही. या त्यांच्या विचारसरणीतून लोककल्याणकारी धोरण जाणवते. १७ व्या शतकात देशांमध्ये गुलामगिरीची प्रथा सुरू होती. त्यांनी गोव्याचे डच, पोर्तुगीज यांना पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात, “ बादशाहाच्या काळात स्त्रीया व पुरूष यांची खरेदी विक्री होत असे, परंतु माझ्या काळात हे होऊ देणार नाही किंवा माझे सैनिक तुम्हाला खरेदी विक्री करू देणार नाहीत.” जी प्रथा या सरंजामदारी व वतनदारी व्यवस्थेत सर्रासपणे चालू होती, त्याला प्रतिबंध घालण्याचे काम महाराजांनी केले. यातून त्यांची समाजक्रांतीतून सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणातून आपल्याला दिसून येते. इ स १६४० मध्ये जगदेवच्या पराक्रमामुळे पुणे सोडून गेलेल्या रयतेस महाराज ‘ नवी रयत ’ असे संबोधतात. यासाठी त्यांनी आज्ञापत्र काढले.

'स्वराज्यात जी नवी रयत सामील झाली आहे, त्यांना कसण्यासाठी जमिनी द्या, त्यांना त्यासाठी लागणारे साहित्य, बैलगाडी, लाकूड फाटा, बी बियाणे आणि पैसे द्या. यातून ते शेती करू शकतील. हा सामाजिक परिवर्तनाचा व सामाजिक न्यायाचा प्रवाह छत्रपती शिवाजी महाराजांनी तयार केला.

प्रकरण तिसरे

शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरण.

१७ व्या शतकात देशांमध्ये गुलामगिरीची प्रथा सुरू होती. त्यांनी गोव्याचे डच, पोर्तुगीज यांना पत्र लिहिले. त्यात ते म्हणतात, " बादशाहाच्या काळात स्त्रीया व पुरूष यांची खरेदी विक्री होत असे, परंतु माझ्या काळात हे होऊ देणार नाही किंवा माझे सैनिक तुम्हाला खरेदी विक्री करू देणार नाहीत." जी प्रथा या सरंजामदारी व वतनदारी व्यवस्थेत सर्रासपणे चालू होती, त्याला प्रतिबंध घालण्याचे काम महाराजांनी केले. यातून त्यांची समाजक्रांतीतून सामाजिक न्यायाची भूमिका आपल्याला दिसून येते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्याचा केंद्रबिंदू बहुजन समाज व शेतकरी समाज हा होता. म्हणून ते कुळवाडीभूषण होते. त्यांनी सरदारांच्या लुटीला विरोध केला. त्यांनी एका आज्ञापत्रात लिहिले आहे की ' तुम्हाला शेतकऱ्यांकडून अतिरिक्त कर वसूल करता येणार नाही, पिकलं नाही तर शेतसारा वसूल करता येणार नाही, दुष्काळ पडला तर शेतसारा माफ करावा लागेल, उत्पन्न पाहून शेतसारा लावावा'. अशा स्वरूपाच्या वतनदाराच्या आर्थिक जाचाला प्रतिबंध घालून महाराजांनी लोककल्याणकारी व्यवस्था निर्माण केली. छत्रपती शिवाजी महाराज केवळ योध्दे नसून नव–समाजरचनेचे व नव्या कृषीरचनेचे जनक होते. इ स १६४० मध्ये जगदेवच्या पराक्रमामुळे पुणे सोडून गेलेल्या रयतेस महाराज ' नवी रयत ' असे संबोधतात. यासाठी त्यांनी आज्ञापत्र काढले.
'स्वराज्यात जी नवी रयत सामील झाली आहे, त्यांना कसण्यासाठी जमिनी द्या, त्यांना त्यासाठी लागणारे साहित्य, बैलगाडी, लाकूड फाटा, बी बियाणे आणि पैसे द्या. यातून ते शेती करू शकतील. हा सामाजिक परिवर्तनाचा व सामाजिक न्यायाचा प्रवाह छत्रपती शिवाजी महाराजांनी तयार केला.

प्रकरण चौथे

शिवकालीन प्रशासन व्यवस्था

छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रशासनात वंशपरंपरेने पदे बंद केली. अधिकाऱ्यांची निवड स्वत: छत्रपती शिवाजी महाराज करत असत. ३ वर्षांनी अधिकारी वर्गाच्या बदल्या केल्या जात असत. छत्रपती शिवाजी महाराज स्वत: आणि वरिष्ठ अधिकारी राज्यात सतत दौरे केले जात. स्वराज्यात कायदेसंहिता होती. सर्व अधिकारी वर्ग छत्रपतीला जबाबदार होता. स्वराज्यात समाजामधील प्रशासनाकडून मतभेद दूर केले जात. प्रशासनात सर्व जातीधर्मातील लोकांना सामावून घेतल्या जात असे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तीमहत्वाचा प्रभाव प्रशासनावर होता. छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रशासनाचे विकेंद्रिकरण करून प्रशासन लोकाभिमुख बनविण्याचा प्रयत्न केला. अष्टप्रधानातील प्रधानाकडे प्रांताची जबाबदारी देवून राजा व प्रजा यांच्यातील अंतर कमी करण्याचा प्रयत्न केला.

प्रकरण पाचवे

शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणाची प्रासंगिकता

समाजात आज कायदयाचे राज्य असूनही मोठया प्रमाणात जात, प्रांत, लिंग, वंश, वर्ण विषमता निर्माण केली जात आहे. राज्यघटनेने दिलेली लोकशाहीची मुल्य स्वातंत्र्य, समता, बंधूता पायदळी तुटवण्याच काम आज होते. पण ३५० वर्षापूर्वी छत्रपती शिवाजी महाराजांनी राजशाही असूनही लोकशाहीला अभिप्रति असणारी मुल्य रूजवण्याच काम आपल्या स्वराज्यात केलं. तशीच स्वराज्याची रचना राज्यघटना, लोकशाही असूनही ती रूजताना दिसत नाहीत. त्यामुळे शिककालीन लोककल्याणकारी ज्यामध्ये शेतकरी, स्त्रीया, बहुजन समाजासाठी राबविण्यात आलेली धोरण. ज्यामुळे कल्याणकारी बहुजनाच मध्ययुगीन भारतात स्वराज्य निर्मिण झालं वर्ण व्यवस्था असूनही. त्याचं शिवकालीन सामाजिक, आर्थिक व प्रशासकीय धोरणाची आजच्या राज्यकर्तास मिळावी. जेणे करून समाजातील सर्व घटकांना त्यातून न्याय मिळेल आणि कल्याणकारी राष्ट्रनिर्माण होण्यास मदत होईल.

प्रकरण सहावे

समारोप / निष्कर्ष

या प्रकरणात संशोधकांच्या संशोधन कार्याच्या अभ्यासातून निघालेल्या निष्कर्ष मांडले जाणार जाणार आहेत. प्रस्तुत शोधप्रबंध हा कच्चा आराखडा असून योग्य संशोधनाच्या माध्यमातून त्यादरम्यान बदल होण्याची शक्यता नाकारता जाणार नाही.

संदर्भ :

१) डॉ. जयसिंगराव पवार ‘मराठी सत्तेचा उदय’

२) सेतुमाधवराव पगडी, मराठयांचे स्वातंत्र्ययुद्ध (खाफीखानाचा साधनग्रंथ) पुणे

३) कृष्णराव अर्जुन केळुसकर, ‘छत्रपती शिवाजी महाराज’ चरित्र

४) सेतुमाधवराव पगडी, मोगल आणि मराठे (तारीखे दिल्कुशा)पहिली आवृत्ती पुणे.

५) मा. प्राचार्य डॉ. व्ही.एल. एरंडे लेख ‘लोककल्याणकारी राजा: छत्रपती शिवाजी महाराज’

६) अ.रा. कुलकर्णी ग.ह.खरे संपादित मराठयांचा इतिहास खंड क्र.१

७) डॉ. जयसिंगराव पवार, ‘छत्रपती शिवाजी महाराज’

८) रघुनाथ विनायक हेरवाडकर, मराठी बखर, पुणे

९) डॉ. प्रभाकर देव ‘मराठयांचा इतिहास’

१०) सदाशिवराव आठवले ‘शिवाजी आणि शिवयुग’

११) श्री छत्रपती शिवाजी महाराज (उत्तीरार्ध) वा. सी. बेंद्रे

१२) स.म. दिवेकर (संपादक) कवींद्र परमानंदकृत शिवभारत, भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे ,

१३) विजय देशमुख — शककर्ते शिवराय

१४) श. ना . जोशी — सभासद बखर

१५) अ. रा. कुलकर्णी — शिवकालीन महाराष्ट्र राजहंस प्रकाशन, पुणे १९९७

१६) अ. रा. कुलकर्णी — 'अशी होती शिवशाही' राजहंस प्रकाशन पुणे २०००

१७) प्रा जयसिंगराव पवार —'शिवाजी आणि शिवकाळ' फडके प्रकाशन, कोल्हापूर

१८) बी. एन. सरदेसाई 'मराठयांचा सामाजिक, आर्थिक व सांस्कृतिक इतिहास'

१९) त्रिंबक नारायण अत्रे, 'गावगाडा' वरदा वुक्क पुणे

२०) प्र. न. जोशी (संपादक) 'आज्ञापत्र' आमात्यकृत, व्हीनस प्रकाशन, पुणे

२१) कुलकर्णी अ. रा. (संपा) आज्ञापत्र पुणे डायमंड प्रकाशन

२२) भट बी. व्ही. १९४१ शिवाजीची राजनीती, धुळे राजवाडे संशोधन मंडळ

२३) अ. रा. कुलकर्णी शिवकालीन महाराष्ट्र, पुणे राजहंस प्रकाशन

२४) गोंविद सखाराम सरदेसाई, 'मराठी रियासत' खंड क्र. १

२५) देशपांडे प्र.न. छत्रपती शिवाजी महाराजांची पत्रे

२६) वि.का. राजवाडे (संपा) मराठयांच्या इतिहासाची साधने खंड १ ते २६

२७) भारत इतिहास संशोधक मंडळ पुणे शिवचरित्र साहित्य भाग १ ते १६

२८) सावंत/जाधव मराठयांचा प्रशासकीय, सामाजिक व आर्थिक इतिहास

२९) ९१ कलमी बखर वि. स. वाकसकर 'भारत वर्ष' मासिकात प्रसिध्द

३०) मोडक बा.प्र ग्रॅट डफच्या इतिहासावर टिका

संशोधक

बोरकर विनोद सखाराम

एम. ए. इतिहास नेट, सेट

मार्गदर्शक

प्रा. डॉ. काशीनाथ निवृत्तीराव चव्हाण

एम.ए. पीएच.डी सहाय्यक प्राध्यापक तथा

संशोधक मार्गदर्शक, इतिहास विभाग

श्री योगानंद स्वामी कला महाविद्यालय,

वसमत ता. जि. हिंगोली ४३१५१३